# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 11 December 2024

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ११ डिसेंबर २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- सातव्या स्मार्ट इंडिया हॅकेथॉनला आजपासून प्रारंभ–देशभरातल्या ८६ हजाराहून अधिक संघांचा सहभाग
- आगामी शैक्षणिक वर्षापासून सामायिक विद्यापीठ प्रवेश परीक्षा, फक्त संगणक आधारित चाचणी स्वरूपात घेण्यात येणार
- राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांच्याविरुद्ध विरोधकांचा अविश्वास प्रस्ताव
- मस्साजोगच्या माजी सरपंच हत्या प्रकरणाचे तीव्र पडसाद–एसटी बसची जाळपोळ

आणि

- बांग्लादेशातील हिंदू अत्याचारांच्या निषेधार्थ सकल हिंदू समाजाचं राज्यभरात आंदोलन

****

सातव्या स्मार्ट इंडिया हॅकेथॉनला आजपासून प्रारंभ होत आहे. देशभरात ५१ केंद्रांवर होत असलेल्या या स्पर्धेत ८६ हजाराहून अधिक संघ सहभागी होत आहेत. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान त्याचं उद्घाटन करतील. यात महाराष्ट्राल्या मुंबई, पुणे, नागपूर आणि कोल्हापूर या केंद्रांचाही समावेश आहे. यानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी आज या विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. यंदाच्या हॅकेथॉनमध्ये संस्था स्तरावर दीडशे टक्के वाढ नोंदवली गेली आहे.

छत्रपती संभाजीनगर इथल्या जी एन सपकाळ अभियांत्रिकी महाविद्यालयातल्या प्राध्यापक सीमा रवींद्र बाजी यांनी या स्पर्धेबाबत माहिती दिली...

***''अतिशय चांगल्या प्रतिसाद या स्पर्धेला मिळालेला आहे. आणि या स्पर्धेमधनं अतिशय छान छान उत्कृष्ट आयडिया प्रेझेंट झालेले आहेत आणि या सर्वांमुळे विद्यार्थ्यांना छान फायदा झालेला आहे तो असा की आज जगामध्ये ज्या समस्या आहेत, त्यांचं निराकरण करण्यासाठी एक सक्षम विचार करायचा असतो. त्यांची फिजीबीलीटी चेक करायची असते. विद्यार्थ्यांना या स्पर्धेमुळे ही फिजीबीलीटी चेक करण्यासाठी लागणारं जे नॉलेज आहे जो कॉन्फिडन्स आहे, तो या स्पर्धेमुळे मुलांना मिळतो.''***

सीमा बाजी यांच्यासह इतर तज्ज्ञांनी या स्पर्धेबाबत दिलेली माहिती, आमच्या केंद्रावरून आज सकाळी दहा वाजून ४५ मिनिटांनी प्रसारित होणाऱ्या प्रासंगिक या कार्यक्रमात ऐकता येणार आहे.

****

आगामी शैक्षणिक वर्षापासून सामायिक विद्यापीठ प्रवेश परीक्षा, फक्त सी बी टी अर्थात संगणक आधारित चाचणी स्वरूपात घेण्यात येणार आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष एम. जगदीश कुमार यांनी काल वार्ताहरांना ही माहिती दिली. विद्यार्थ्यांनी १२ वीच्या परीक्षेसाठी निवडलेले विषयच या परीक्षेत घेण्याचं बंधन असणार नाही. पूर्वी ३७ विषयांच्या परीक्षा घेतल्या जात होत्या, आता ६३ विषयांच्या परीक्षा घेतल्या जाणार असून, विद्यार्थ्यांना जास्तीतजास्त पाच विषयांची निवड करता येईल. पूर्वी विद्यार्थ्यांना ६ विषयांची निवड करता येत होती.

****

सायबर गुन्हेगारी आणि हवामान बदल ही मानवाधिकारासमोरची नवी आव्हानं असल्याचं प्रतिपादन, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. काल आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिनानिमित्त नवी दिल्लीत विज्ञान भवनात झालेल्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

मुंबई राजभवनात राज्यपाल सी.पी राधाकृष्णन यांच्या उपस्थितीत आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाच्या २०२४ स्मरणिकेचं प्रकाशन करण्यात आलं.

छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी कार्यालयात मानवी हक्क दिनानिमित्त विधीज्ञ अभय टाकसाळ यांचं व्याख्यान झालं. प्रत्येक माणसाने अन्य माणसांच्या हक्कांची जोपासना करणं, या कर्तव्याबद्दलची जाणीव वृद्धिंगत करण्याची गरज त्यांनी व्यक्त

केली. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी यावेळी बोलतांना, मानवी हक्कांच्या जोपासनेच्या कर्तव्याचं पालन आपल्या घरापासून करण्याचं आवाहन केलं.

****

राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांच्याविरुद्ध काँग्रेसप्रणित विरोधी आघाडीने अविश्वास प्रस्ताव मांडला आहे. काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी ट्विटरवर याबाबत माहिती देतांना, विरोधी पक्षांच्या सदस्यांना सभागृहात बोलण्याची संधी नाकारुन सभापती पक्षपात करत असल्याचा आरोप केला.

दरम्यान, संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज कालही बाधित झालं. लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करत, सभागृहाच्या मर्यादेचं पालन केलं जावं, तसंच जनतेच्या मताचा आदर राखून काम करण्याचं आवाहन केलं.

****

राज्य विधानसभा निवडणुकीत व्हिव्हीपॅट पडताळणीबाबत सर्व प्रक्रियेचं तंतोतंत पालन केल्याचं, निवडणूक आयोगानं स्पष्ट केलं आहे. २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणीवेळी २८८ मतदारसंघातल्या १ हजार ४४० व्हिव्हीपॅट युनिटची मोजणी करण्यात आली. यावेळी व्हीव्हीपॅट आणि मतदान यंत्रातली एकूण मतं, यामध्ये कुठलीही तफावत आढळून आली नाही, असं आयोगानं जारी केलेल्या पत्रकात स्पष्ट करण्यात आलं आहे.

****

दरम्यान, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांवर बंदी घालून आगामी सगळ्या निवडणुका मतपत्रिकेद्वारे घेण्याच्या मागणीसाठी काल रत्नागिरी इथून काँग्रेस पक्षानं स्वाक्षरी मोहीम सुरू केली आहे. यावेळी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

****

सोलापूर जिल्ह्यातल्या मारकडवाडी इथं काल भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर आणि आमदार सदाभाऊ खोत यांच्या उपस्थितीत इव्हीएमची मिरवणूक काढण्यात आली. ईव्हीएमला विरोध करणाऱ्या अनेक नेत्यांच्या भूमिकेवर यावेळी टीका करण्यात आली.

****

माजी राज्यपाल एस. एम. कृष्णा यांचं काल बेंगळुरू इथं त्यांच्या निवासस्थानी वृद्धापकाळाने निधन झालं, ते ९२ वर्षांचे होते. कर्नाटकचे मुख्यमंत्री तसंच केंद्रीय मंत्रिमडळात परराष्ट्र मंत्री म्हणून काम पाहिलेले कृष्णा यांनी २००४ ते २००८ दरम्यान महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाची जबाबदारी सांभाळली होती. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन तसंच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कृष्णा यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

****

केज इथं घडलेल्या हत्या प्रकरणाचे काल तीव्र पडसाद उमटले. संबंधित मारेकऱ्यांना अटक करण्याच्या मागणीसाठी रस्त्यावर उतरलेल्या संतप्त जमावाने एसटीची एक बस पेटवून दिली, तर दुसऱ्या बसवर दगडफेक केली. या दुर्घटनेत कोणीही प्रवासी जखमी झाला नसल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

केज तालुक्यातल्या मस्साजोगचे माजी सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून हत्या झाल्याचं परवा निदर्शनास आलं होतं, या प्रकरणी पोलिसांनी पाच आरोपींना अटक केली आहे. या गुन्ह्यात सहभागी प्रत्येकावर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येणार असून, नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असं आवाहन प्रभारी पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांनी केलं आहे.

****

बांग्लादेशातल्या हिंदू नागरिकांवर होत असलेल्या अन्याय, अत्याचारांच्या निषेधार्थ काल जागतिक मानवी हक्क दिनाच्या पार्श्वभूमीवर सकल हिंदू समाजाच्या वतीनं राज्यभरात मोर्चे काढून निदर्शनं करण्यात आली.

छत्रपती संभाजीनगर इथं जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात हिंदू संघटनांच्या सदस्यांसह भारतीय जनता पक्षाचे आमदार अतुल सावे, जिल्हाध्यक्ष शिरीष बोराळकर आणि पदाधिकारी सहभागी झाले होते.

नांदेड शहरासह जिल्ह्यात किनवट, मुखेडसह अनेक तालुक्याच्या ठिकाणी मोर्चा काढून प्रशासनाला निवेदन देण्यात आलं.

जालना इथंही जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून जिल्ह्याधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांना तर जिल्ह्यात सर्वच तहसील कार्यालयावर मोर्चा काढत तहसीलदारांना निवेदन देण्यात आलं.

परभणी इथंही जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. या मोर्चाला सकल हिंदूचा चांगला प्रतिसाद मिळाला.

हिंगोलीतही जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. यावेळी बांगलादेशचा ध्वज आणि मोहम्मद युनूस यांच्या प्रतिमेला जोडे मारण्यात आले. यावेळी आमदार तानाजी मुटकुळे, आमदार संतोष बांगर यांच्यासह नागरिक आणि विविध पक्षातले पदाधिकारी उपस्थित होते.

लातूर शहरात गांधी चौक इथं करण्यात आलेल्या धरणे आंदोलनात, विद्यार्थी, महिलांसहित सर्वच वयोगटातले नागरिक आणि अनेक हिंदू संघटनांचे सदस्य सहभागी झाले होते.

बीड जिल्ह्यातही हिंदू समाजाच्या वतीनं निदर्शनं करण्यात आली. अंबाजोगाई इथं छत्रपती शिवाजी महाराज चौकात निदर्शनं करून, राष्ट्रपतींच्या नावे असलेलं निवेदन उपजिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात आलं.

धाराशिव इथंही जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शनं करण्यात आली. शहरातल्या विविध सामाजिक संघटना तसंच सर्व राजकीय पक्षाचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

****

परभणी इथं डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासमोरच्या संविधान प्रतिमेची काचेची पेटी काल एका माथेफिरूने फोडल्याचा प्रकार निदर्शनास आला. सदर व्यक्तीस अटक करण्यात आली असून, नागरिकांनी शांतता राखण्याचं आवाहन परभणीचे जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी केलं आहे...

> ***''त्या इसमाला आम्ही तात्काळ अटक केली आहे. तो पोलीस कस्टडीमध्ये आहे. सर्व नागरिकांना मी आवाहन करतो, विनंती करतो की, आपण कुठलीही कायदा सुव्यवस्था बिघडणार नाही यासाठी आपण दक्षता घ्यावी व कोणत्याही प्रकारच्या अफवांवर आपण विश्वास ठेवू नये. सदर ठिकाणी मी स्वत: भेट दिलेली आहे आणि परिस्थिती नियंत्रणात आहे.''***

****

बीड जिल्ह्यात अंबाजोगाई तालुक्यात काल सकाळी अपघात होऊन चौघांचा मृत्यू झाला, तर दोघे जखमी झाले. अंबासाखर कारखान्याजवळ कार आणि ट्रकची समोरासमोर धडक होऊन हा अपघात झाला. कारमधील सर्व प्रवासी लातूर

जिल्ह्यातल्या रेणापूर तालुक्यातले रहिवासी असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत काल लातूर इथल्या वसंतराव काळे होमिओपॅथीक महाविद्यालय आणि रुग्णालयात आमदार विक्रम काळे यांच्या हस्ते नि:क्षय वाहनास हिरवा झेंडा दाखवून क्षयरुग्ण शोध मोहीमेचं उद्घाटन करण्यात आलं. यावेळी विद्यार्थ्यांनी क्षयरोगाची लक्षणे, निदान आणि उपचार याबाबत पथनाट्य सादर केलं.

****

थकीत मालमत्ता कर वसूल करण्यासाठी लातूर महापालिकेने धडक मोहीम हाती घेतली आहे. याअंतर्गत काल झोन ए मध्ये दोन गाळे सील करण्यात आले, तर काही नळ जोडण्या खंडित करण्यात आल्या. बी झोनमध्ये एका मालमत्तेवर कारवाई करताच संबंधिताने दोन लाख ८१ हजार २९ रुपयांचा धनादेश जमा केला.

छत्रपती संभाजीनगर महापालिकेनेही एक लाख रुपयांपेक्षा अधिक थकीत मालमत्ता कर वसुलीसाठी मोहीम सुरू केली. पाच मालमत्तांवर काल कारवाई करण्यात आली, यापैकी तीन मालमत्ता धारकांनी तत्काळ थकबाकीचे धनादेश जमा केल्याचं वृत्त आहे.

****